# धूम्रपानाच्या प्रमाणात सात टक्क्यांनी वाढ !

## ➲ 'इंडस हेल्थ प्लस'तर्फे राज्यात सर्वत्र जनजागृती सुरू

**पणजी, दि. ३० (प्रतिनिधी)**

धूम्रपान कमी व्हावे, यासाठी सरकार दरवेळी सिगारेटच्या दरात भरीव वाढ करते; तरीही धुम्रपान करणाऱ्यांचे प्रमाण कमी होताना दिसत नाही. मागील वर्षाच्या तुलनेने गोव्यात यंदा धुम्रपान करणाऱ्यांच्या संख्येत सात टक्क्यांनी वाढ झाली आहे, अशी माहिती 'इंडस हेल्थ प्लस' या आरोग्याबाबत जागृती करणाऱ्या संस्थेच्या असिस्टंट मॅनेजर त्रिशा रॉय यांनी दिली.

जागतिक तंबाखू दिनानिमित्त शनिवारी 'इंडस हेल्थ प्लस'तर्फे पणजी येथील आयनॉक्स परिसरात आयोजित क्वीट टुडे, क्वीट नाऊ' या जनजागृती कार्यक्रमात रॉय बोलत होत्या. तंबाखू विरोधी दिनानिमित्त 'इंडस हेल्थ प्लस'तर्फे लोकांना धुम्रपान त्वरित सोडा, हा संदेश देण्यासाठी जागृती कार्यक्रम राबवले जात असून सार्वजनिक ठिकाणी पत्रके वाटून ही मोहीम यशस्वी केली जात असल्याचे त्रिशा रॉय म्हणाल्या. सिगरेटच्या पेहराव केलेल्या दोन व्यक्तींद्वारे ही पत्रके वाटण्यात येत असल्याने लोकांना त्यांचे आकर्षण वाटते. गोवा सरकारने सार्वजनिक ठिकाणी धुम्रपानाला बंदी घातल्याने धुम्रपानाला काही प्रमाणात आळा बसल्याचे निवेदन रॉय यांनी केले. ताण-तणाव हे धुम्रपानाचे मुख्य कारण असल्याचे सांगून धुम्रपानामुळे व तंबाखू चघळण्यामुळे कॅन्सर होतो, हे लोकांना पटवून देण्याचे कार्य आपली संस्था करत असल्याचे त्यांनी शेवटी सांगितले.